॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्र पेटी क्र. ८०, उमवि नगर, जळगाव -४२५ ००१

## जाहीर प्रकटन

राज्यातील ग्रामीण, डोंगराळ व आदिवासी भागामध्ये उच्च शिक्षण उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र शासनाने, **"महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६"** अंमलात आणलेला आहे. सदर अधिनियमातील कलम १०९ (४) (क) यामधील नमूद तरतूदीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एनजीसी/२०२०/(११५/२०)/मशि-४ मंत्रालय, मुंबई-३२ दि. १८ सप्टेंबर, २०२० नुसार ***सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापासून नवीन सॅटेलाईट केंद्र यांना मंजूरी देण्यासाठी कार्यपध्दती व निकष विहीत करण्यात आलेले आहेत.*** त्यास अनुसरुन सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापासून नवीन सॅटेलाइट केंद्र सुरु करण्यास इच्छूक संस्थांनी **दिनांक ३०/०९/२०२० किंवा तत्पूर्वी** ऑनलाईन पध्दतीने सादर करणेसाठी विद्यापीठातर्फे जाहीर आवाहन करण्यांत येत आहे.

उपरोक्त नमूद केलेले अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी विस्तृत स्वरुपातील माहिती विद्यापीठाच्या **www.nmu.ac.in** या संकेतस्थळावर Homepage वरील R & D या विभागातील Affiliation वर pointer ठेऊन त्यातील Online Affiliation या Link वर click करुन **Proposal Guidelines 2021-22** येथे उपलब्ध असून अर्ज भरतेवेळी helpline देण्यांत आलेली आहे. शासनाने यासंदर्भात निर्गमित केलेले शासन निर्णय, प्रक्रिया आदि शुल्काचे परिपत्रक, माहिती आणि संबंधित परिपत्रके त्याचठिकाणी **Important G.R./ Circulars** आणि **Other G.R./Circulars** या Link वर उपलब्ध करुन देण्यांत आलेले आहे.

तरी उपरोक्त Link मध्ये नमूद केलेल्या सूचनांचे अवलोकन करुन त्यानुसार ऑनलाईन प्रणालीव्दारे परिपूर्ण अर्ज भरुन त्याची हार्ड कॉपी आवश्यक तेवढ्या प्रतींत आवश्यक त्या कागदपत्र व शुल्कासह दिनांक **३०/०९/२०२०** किंवा तत्पूर्वी संलग्नता विभागात सुटीचे दिवस वगळून समक्ष सादर करावेत. अपूर्ण भरलेले, अपूर्ण दस्तऐवज असलेले, साक्षांकीत कागदपत्र नसलेले व मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

ठिकाण:-जळगांव **(प्रा. डॉ. बी.व्ही. पवार)**
दिनांक:- २२/०९/२०२० **प्र.कुलसचिव**